जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
जावक क्रमांक २७०/खनिज/१९

दि. १९ /०६/२०१९

# आदेश

विषय:- मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदीपट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना करण्याबाबत

संदर्भ:- शासन निर्णय, पर्यावरण विभाग क्रमांक: NGT-२०१८/प्र.क्र.२/तां.क.३ दि. १३/१२/२०१८.

.......

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांबाबत दिनांक १७.०१.२०१८ रोजी दैनिक 'द हिंदू' मध्ये प्रसिद्ध वृत्ताच्या अनुषंगाने म. राष्ट्रीय हरीत लवाद दिल्ली यांनी मूळ अर्ज क्रं. ३७३/२०१८ दाखल करून घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक २०.०९.२०१८ रोजी आदेश पारित करताना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्ट्यांचे वर्गीकरण प्राथम्य क्रं. I ते IV प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्ट्यांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्ट्यांमधील ९ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. I, ६ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. II, १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमांक III, १० प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. IV व १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र.V मध्ये समाविष्ट आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील वर्धा नदी घूग्घूस ते राजूरा हा प्रदूषित पट्टा प्राथम्य क्रं.II मध्ये अंतर्भूत करण्यात आलेला आहे.

मा. हरीत लवाद, दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानूसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्ट्यांमधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृति आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरिता नदी पुनरूत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याचे आदेश उपरोक्त शासन निर्णयानूसार घेण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानूसार प्रदूषित नदीपट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल (Special Environment Surveillance Task Force)ची स्थापना मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्रं. | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १ | जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर, मा. जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर यांचे प्रतिनिधी |
| २ | पोलिस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा, पोलिस मुख्यालय, चंद्रपूर, मा. पोलिस अधिक्षक, चंद्रपूर यांचे प्रतिनिधी |
| ३ | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर किंवा त्यांचे प्रतिनिधी |
| ४ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर |

उपरोक्त समितीच्या सदस्यांमध्ये समन्वय साधणे, वेळ प्रसंगी क्षेत्र भेटीचे नियोजन करणे, बैठकांचे आयोजन करणे व निर्णयांची अंमलबजावणी करणे इत्यादी बाबत कार्यवाही करण्याची जबाबदारी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांची राहील.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर

सोबत:- शासन निर्णय दि. १३/१२/२०१८.